म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र. १७७७०

# सारिका

डॉ. शं. ज. जोगळेकर



REFBK-0016958

# सारिका

डॉ. शं. ज. जोगळेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ वि: काव्य
क्रमांक ........ नोंद दि: ........

REFBK-0016958

प्रमिला प्रकाशन

© सौ. प्रमिला जोगळेकर

□

प्रथमावृत्ती
१९६८

□

चार रुपये

□

प्रकाशक :
सौ. प्रमिला शं. जोगळेकर
**प्रमिला प्रकाशन**
टोपीवाला वाडी,
सरदार पटेल रस्ता,
मुंबई–४.

□

मुद्रक :
श्री. मधुकर पाटकर,
**आवाज प्रिंटर्स**
अल्लाना कंपाऊंड,
आग्रीपाडा, मुंबई–११.

# हृद्गत

व्यवसायाने डॉक्टर असल्यामुळें रोज ठणका, दुःख, वेदना, पहात जगलो तेव्हां अंतर्यामी जे अनुभवलें तें आपोआप शब्दरूप होत, त्याला साकार करण्याचा अल्पसा प्रयत्न केला. अनेक पाउलवाटा तुडवल्या त्या कांटेरी वाटल्या. पायपीट करून थकल्यावर पुन्हां त्या वाटांकडे वळणार नाहीं असें ठरवून एकटाच आपली वाट चालू लागलो. सारेच प्रवासी आपल्याला साथ देत नाहींत, तरी एखादा सहज आपल्या-कडे वळून पहातो हे अनुभवलें. त्यांत ज्यांनी मजकडे पाहिले व आधार दिला असे थोडे. त्यांच्यांबद्दल मी केव्हाही उतराईच राहीन. कांही तरी. प्रतिकात्मक ऐकवण्याची मला संधी लाभली ती समोर ठाकलेल्या **सोपानाचे** पायरी पाशी. या पायरीवरच आशा–निराशेचे सगळे खेळ लुप्त झाले व पुढे दिसली ती फक्त प्रतिकात्मक “ **सारिका** ”

शं. ज. जोगळेकर

## अर्पण

हरवली पाखरण
सोडी ना चरण

आई तुझी राखण
अजूनी क्षणोक्षण

करूनी स्मरण
तुज हें वंदन

प्रीतीचें हें वाण
तुज अर्पिले, चरण.

१०-५-६७

# पु र स्का र

मराठी ... ग्रंथालय ... १६९५८

श्री. शंकर जयराम जोगळेकर यांचा डॉक्टरी पेशा असून ते हातीं यश घेऊन आलेले एक नामांकित डॉक्टर म्हणून प्रसिद्ध आहेत. बरेच वर्षांपासून आम्ही एकमेकांना नांवानें ओळखत होतों, परंतु त्यांचा प्रत्यक्ष असा परिचय श्री. बापुराव उपाध्ये यांनीं करून दिला. श्री. गजाननराव ऊर्फ बापुराव उपाध्ये हे माझे एके काळचे विद्यार्थी ! परंतु खरें सांगायचें म्हणजे ते माझे एक बंधुतुल्य मित्र आहेत. डाक्टरांची ओळख करून देतांना ते एक कलावंत डॉक्टर आहेत हें सांगायला बापुराव विसरले नाहीत. बापुराव हे काव्याचे आणि संगीताचे मर्मज्ञ रसिक, तेव्हां त्यांनीं करून दिलेली ओळख यथार्थच असणार यांत काय शंका ?

मानव प्राणी हा मुळांतच कलेचा भुकेला असतो. मनाला विरंगुळा म्हणून तरी तो कलेकडे धाव घेतो. त्याशिवाय त्याच्या मनाला लागलेली भूक शमूंच शकत नाहीं. श्रमजीवी माणूस आपले कष्ट हलके करण्याकरितां गाणें गातो. ओठांत येईल तें गुणगुणतो. कंठ नसला तरी आकंठ आनंद उपभोगीत असतो. बुद्धिवादी माणूस आपल्या मनांतील तरंग-लहरी लेखणीनें लिहितो. कुंचलीनें रंगवितो जीवनांतील ज्या ज्या सुखांनीं तो सुखावतो, ज्या ज्या दुःखांनीं दुखावतो तीं सुखदुःखें सांगण्यांत त्याच्या मनाला समाधान वाटतें. कांहीं तरी संघर्ष घडल्याशिवाय मनांत तरंग कसे उठणार ? आशा-निराशांची 'सारिका' हि हेंच सांगते. "नातरी सागरीच्या पाणी, काय तरंगाचिया आहेत खाणी ? परि ते आवांतर करणी, वारियाची नोहे ?" विचारांचें, कल्पनांचें, भावनांचें वारें लागल्याशिवाय मानवी मनांत आणि अंतःकरणांत तरंग कसे उठावेत ? अशा कल्पनांचें, भावनांचें वारें

कवि डॉ. जोगळेकर यांना लागल्याशिवाय कसें राहील ?

डॉक्टरांच्या दवाखान्यांत मी पहिल्या प्रथम आलों तो त्यांचा मित्र म्हणून! त्यांच्या दवाखान्याची मांडणीच त्यांच्या कलात्मकतेची साक्ष देत होती. ज्या भिंतीशीं मी खुर्चीवर बसलों होतों त्या भिंतीकडे जातांना वळून पाहिलें, तों भिंतीनेंही माझ्याकडे टवकारून पाहिलें. मी मनांत म्हणालों, " भिंतीला कान असतात तसेच तिला डोळेहि असतात. " सुंदर देखाव्यांनीं नटलेलीं वॉटर कलरचीं दोन तीन चित्रें भिंतीला लावलेलीं मला दिसलीं. डॉक्टर जोगळेकरांनींच रंगविलेलीं तीं चित्रें ! त्यांना चित्रकलेचें चांगलें देणें आहे असें मला आढळून आलें. कांहीं दिवसांनीं डॉक्टरांनीं माझ्या हातीं एक बाड दिलें. त्यांतील कांहीं कवितांकडे माझें चित्त वेधलें. त्याचबरोबर त्यांनीं रंगविलेलीं भिंतीवरचीं चित्रेंही माझ्या दृष्टीसमोर उभीं राहिलीं. डॉ. जोगळेकरांनीं चित्रांमध्यें कुंचलीनें जसें रंगविलें तसेंच त्यांच्या कवितेंत लेखणीनें प्रगट झालेलें काव्य मला दिसून आलें. त्यांच्या चित्रांतील ( निसर्गाच्या देखाव्यांतील ) ज्या व्यक्ति दाखविल्या आहेत त्या सर्व पाठमोऱ्या आहेत. त्यांचा केशकलाप दिसेल, परंतु मुखचंद्रमा दिसणार नाहीं. सुंदर केस असणाऱ्या स्त्रीचा चेहरा सुंदर असतोच असें नाहीं. परंतु एंकदरींत तिची ठेवण व रंगरेखेची आभा बघून मुखाची शोभाही तशीच असावी असें मनोमन वाटतें.

कवि डॉ. जोगळेकर यांच्या कवितांचा कालखंड पाहिला तर तो एकोणीसशें बासष्टपासून तर सदुसष्टपर्यंत अवघ्या पांच वर्षांचा आहे. पंचावन्नीला आलेले डॉ. जोगळेकर अनुभव-अनुभूतीनें जुने, जाणिते, मुरलेले असले तरी काव्यक्षेत्रांत ते नवखेच आहेत. शब्दब्रह्माची साधना ते नव्यानेंच करीत आहेत.

**नवें पान, नवी शाई**
**नवा शब्द सुचत नाहीं**
**नव्या जगाचा पाईक मी**
**आकार मात्र घेत नाहीं**

'शब्दपूर्ती' या आपल्या कवितेंत खुलास दिलानें ते सांगत आहेत: "त्या शब्दांचा ठाव लागण्यासाठीं टाकीचे घाव सोसल्यावाचून मनांतील भाव कसे उमटणार ?" असा हा प्रश्न ते आपल्या मनालाच करतात. मनोमय छिन्नी–हातोडीनें शब्दाना साकार करण्याचा प्रयत्न करतात. नवे शब्द वदवूं लागतात. आणि 'शब्द' या कवितेंत त्यांना जाणीव होते :

**शब्दाच्या मेखले, विश्वची वेढिलें**
**शब्द अर्थानें या जगची जोडिलें**

जगांतील सुखदुःखें, माणसांची मनोवृत्ति, त्यांचे उसासे, दिलासे, अंतरींच्या ओल्या जखमा कवीला दिसूं लागतात :

**पहुडलेल्या तुझ्या जखमा**
**विव्हळून झोंबताहेत**
**त्यांचा कांहीं आर्त निरोप**
**कळवळून सांगताहेत.**

हा निरोप देणारे शब्द अश्रू बनून येतात. त्या आसवांचें मनोगत मागच्या आठवणी पुढें आणतात. अश्रूंनी भिजलेल्या या ओल्या आठवणी :

**ओघळलेले अश्रू तुझे**
**पूर वाहून धावताहेत**
**आठवणींचे ओले क्षण**
**तुला मला भिजवताहेत.**

मानवी मनाच्या प्रकृतीचीं त्याचबरोबर विकृतीचीं अनेक क्षणचित्रें कवीनें रंगविलीं आहेत. कांहीं कांहीं ठळक आहेत, कांहीं पुसकट आहेत. कांहीं चित्रांत रेघोट्या दिसताहेत, तर कांहीं चित्रांत संभ्रम-विभ्रमांचे डागही पड-लेले दिसत आहेत. त्यांना जें दिसलें, जें पटलें त्याची जाणीव मात्र या कविता-



........................ दि: ........................

क्षणचित्रांतून बोलून उठते यांत संशय नाहीं. माणूस येथून तेथून एकच. ' माणसें माणसें ' या कवितेंत ते म्हणतात :

"कलंदर असो, धुरंधर असो
मध्यंतरांत, निरंतरांत
अधांतरांत, युगांतरांत
शिकंदर असो, बिलंदर असो
माणूस इथून तिथून एकच !"

या माणसानें प्रगतिशील असावें, परंतु एकंदरींत जगाकडे पाहिलें म्हणजे कवीला मोठा भ्रम पडतो, त्याच्या मनांत गोंधळ निर्माण होतो :

कांहीं कांहीं कळत नाहीं
कां आम्हां वळत नाहीं ?
गती मात्र घेत असतों
प्रगती कधीं करीत नसतों.

यासारखींच समाजांतील दुःखें बघून मनांत आलेले विचार कवीनें आपल्या इतर कवितांमध्येंहि प्रगट केलेले आहेत. ' तळपतें पातें,' ' सडकेवरची कडकलक्ष्मी,' ' वेदना,' ' वंचना,' ' शुभाशुभ ' आणि ' कोडें ' या कविता याची साक्ष देतील.

कवीची भाषा पद्याकडे जातांजातां बहुधा गद्याकडे झुकते, तोल सांभाळते, परंतु ताल साधत नाहीं. त्यामुळें ज्याला यथार्थानें भावगीत म्हणतां येईल अशीं भावगीतें हाताच्या बोटावर मोजण्याइतकींच साधलेलीं आहेत. त्यांपैकीं एका गीताचा उल्लेख केल्यावांचून राहवत नाहीं. ' रेशमी धागे ' या कवितेची सुरवातच बघा :

लांब लांब सावळी सावळी आमची—हळूहळू फिरे
आम्ही कशा पाठच्या बहिणी—हातांत हात

परकराचे सोगे खोवूं--तुमच्यावर मात!
सोनेरी झिपऱ्या पोरी—बांध गजरा
डोळ्यांवर आल्या तर—बिघडेल तोरा

सहजगत्या आलेल्या या ओळी शब्दांनीं पायांत घुंगुरू बांधून यावें, तशा नाचत आलेल्या आहेत. त्या ऐकून 'झिम पोरी झिम'चा ताल अंगांत संचरतो.

निसर्गावर लिहिलेली 'उदधि' ही प्रदिर्घ कविता देखील उल्लेखनीय अशी वाटते :

काळानें ओतिलें उधाण ज्यांतून
भरती ओहोटी दाविती निदान
क्षितिजा चाटतें, चोखतें अस्मान
अथांग सागर निळा रत्नाकर
मानवें नमीला होउनी किंकर!

लाटांगत हेलकावे खात खात ही कविता पुढें पुढें सरकत जाते. सागराला भरती आली म्हणजे त्यांत काय येईल आणि काय नाहीं! त्याचप्रमाणें तंद्री-मध्यें येतील त्या कल्पना आणि विचार कवीनें या कवितेंत खेळविलीं आहेत.

'सारिका' या कवितासंग्रहांत निदान सहासात कविता कर्दळीवर लिहिलेल्या आहेत. कांहीं कवितांमध्यें कर्दळीचे हृद्द असे उल्लेख आहेत. एकंदरींत कवीला कर्दळीचा विशेष लळा दिसून आला.

माझ्या दारींची कर्दळ
लाल, पिवळी, नारिंगी वर्दळ!
माझ्या दारींची तेवढीच खूण
फुलवून जाते माझें जीवन!

कवीच्या जीवनांत या कर्दळीनें निरागस आनंद ओतला आहे. कधीं कधीं कवि रुसव्यानें कर्दळीशीं बोलतां बोलतां वर्दळींवरही येतो. परंतु क्षणभरच! भुलावणी

घालणारी कर्दळ त्याला तसें करूं देत नाहीं. तिचा हळुवारपणा पहा:

**कर्दळीची भूल पडली, पहाट सुगंधाला**
**दवाखालीं लपलेल्या थंड अशा मातीला...**

उगवता सूर्यनारायण तोही कसा लपत छपत येतो, कारण :

**उगाच चाहूल लागेल**
**गोड साखरझोपेला**

कठोरता आणि कोमलता यांचें प्रतीक म्हणून निवडुंगाचें पान आणि अळूचें पान अशीं निसर्गानें निर्माण केलेलीं हीं दोन प्रकारचीं पानें ! या दोन्ही पानांचें कवीनें केलेलें कौतुक बघण्यासारखें आहे.

'काटा' या कवितेबद्दलही ओघानें येथें लिहावेंसें वाटतें. 'काटा' म्हणतो, माझें कुणीच कौतुक करीत नाहीं. कारण ज्या कुंपणांत माझें अस्तित्व तेंच कुंपण वाट अडविण्यासाठीं असतें. कोण माझ्या वाटेला जाणार आणि कुणाच्या मी वाट्याला येणार ? परंतु तो योग आला. एक भिल्लीण कन्या कुंपणाजवळ आली. तिचा चंचल आणि सुंदर हात माझ्याकडे वळला. तिच्या बोटाला माझा स्पर्श झाला. ती म्हणाली, "मी चुकलों गो बाटा !" तिचे मधुर शब्द ऐकून काट्याला गोड संवेदना झाल्या. याच दृष्टिकोणांतून 'दुसरेंच पान पालवलें' ही कविता वाचून बघावी. सहज जातां जातां कवि काटेरी फूल तोडावयास गेला :

**फूल गेलें निसटून**
**वण मात्र राहिला**
**वण अजून झोंबतो**
**आठवण करून देतो**

परंतु कालांतरानें कवीचा वणही गेला आणि आठवणही गेली. आणि मग :

दुसरेंच पान पालवलें,
कळ्या पाकळ्या फुलून !

या गंभीर आणि हृद्य कवितांबरोबरच कांहीं विनोदी कविताही कवीनें लिहिल्या आहेत. कांहीं 'वात्रटिका', 'तिर्कस आशय', 'बेडकीचें लग्न', 'चहाची आवड' अशा विनोदी कवितांची लज्जतही या 'सारिका' कवितासंग्रहांत आहे. दुधाच्या पातेलींत माशी पडली तेव्हांपासून कवीनें दुधाची किळस घेतली. 'माशीची बदमाशी भोवली.' कवीनें दूध पिणें बंद केलें. परंतु तेंच दूध चहांत पडून गोड झालें. कवि 'दुधखुळा' होता तो 'चहाटळ' बनला.

कांही शृंगारिक, आणि शृंगाराचा स्पर्श करून गेलेल्या कविताही आढळून येतात; त्याचप्रमाणें मनावर ठसा ठेवून जातात. 'निळ्या ओढणीखालीं' या कवितेंत :

**नवें अस्तर नवा रंग**
**पालटून गेली नवी काया**
**कात टाकून नागिण यावी**
**तशी आली माझी प्रिया !**

डंख देणार कीं काय ? म्हणून कवि मनांतल्या मनांत चरकतो, परंतु छे ! त्याच्या गळ्यांत तिचे करपाश पडले :

**नवनीतापरी विरघळलों**
**तिच्या उष्ण श्वासांनीं**
**अन् निळ्या ओढणीखालीं**
**दडलेल्या कृष्णकमळांनीं**

याप्रमाणेंच त्यांच्या 'ओलेतीस' या कवितेंतील मादक सौंदर्याची वाहणी बघण्यासारखी आहे :

काय स्वप्न पाहती नयन
ओलें चिंब थबथबलें यौवन
पाठीच्या पन्हाळांतून मादकता
निथळते ओसंडून जातां जातां

' ओलेतीचें ' मादक सौंदर्य तिच्या पाठीच्या पन्हाळांतून निथळत गेलें, ही कल्पनाच किती कमनीय आणि बहारीची आहे हें निराळें सांगावयास नको. असा हा कल्पनाविलासही कवीच्या अंतःकरणांत हजेरी लावून जातो.

' एका वर्तुळांत ' या कवितेमध्यें कवि डॉ. जोगळेकर म्हणतात :

चौकटीच्या चौकड्यांतून निसटलों
त्रिकोणाच्या त्रांगड्यांत सापडलों
वर्तुळाच्या चक्रांत अडकलों
चक्रम् बनलों, भांबावलों

परंतु अखेर तो सरळ रेषेंत येतो. कवीची काव्यसाधनाही अशाच मार्गानें आली आहे, येत आहे. स्वतःच्या मनाला विरंगुळा म्हणून कां म्हणाना, गेल्या पांच वर्षांत कवि डॉ. जोगळेकरांनीं कविता लिहून स्वतःला कविमन आहे हें सिद्ध केलें. ' सारिका ' या कवितासंग्रहाबद्दल जेवढें सांगावयाचें तेवढें सांगितलें. त्यांतील काव्याची वानगी रसिकांना दिली.

आतां कवीशीं थोडें हितगुज करावयाचें आहे. या कविता-संग्रहांत मी उल्लेखिलेल्या कवितांव्यतिरिक्त कांहीं कवितांमध्यें कल्पनांची व विचारांची गुंतागुंत आढळून येते. ' सूत सुतें गुंतलें, तृण तृणेंचि बांधिलें ' अशी कांहीं गुंतागुंत असली तर ती जाणवत नाहीं. कारण तेथें एकमेकांना एकमेकांचा परिपोष असतो. परंतु तसें नसलें, थोडी तरी विसंगती आली, कीं कवितेचा ओघ अडतो. त्या ठिकाणीं भोवरे बनतात. थोडक्यांत म्हणजे काव्याला परिपोषक अशी शब्दकला आत्मसात् करावयास हवी. पद्यरचनेंत मध्येंच गद्यरचना आली कीं ती खटकते. बोध होतो, परंतु नाद येत नाहीं. कवितेंत बोध आणि नाद दोन्ही हवेत.

कवीच्या ‘ जीवन ’, ‘ तुकाराम ’, ‘ आम्ही देहूकर ’ या कविता वाचून ते तुकारामभक्त आहेत यांत शंका उरत नाहीं. संत तुकाराम म्हणतात, “ शब्दां नाहीं रुची, मग कैसा तुका वेंची ? ” ज्या शब्दांना रुचि नाहीं ते मी कसे वेचणार ? शब्दांची रुची व त्यांचें सामर्थ्य कळल्याशिवाय कविता प्रभावी होऊं शकत नाहीं. ‘तुका म्हणे कवि जगामध्यें रुढ दावी !’ तें दर्शन घडवितां येत नाहीं. मला स्वतःला तर असें वाटतें कीं, “ शब्दांचा जन्मच मुळीं कृतींना अमर करण्यासाठीं झालेला असतो. ” या सार्थकतेची जाणीव हवी–कवि डॉ. जोगळेकर त्या साधनेंत आहेत हें मी उल्लेखिलेल्या कवितांवरून दिसून येईल. साधनेंतून साध्य घडावें हाच मथितार्थ !

समीक्षक म्हणून कवि डॉ. जोगळेकर यांच्या ‘सारिका’ कविता संग्रहाला पुरस्कार लिहिला. समारोप त्यांच्याच कवितेंत करावासा वाटतो :

**समीक्षकांच्या समीक्षणांतून**
**उमटति रेखाकृति तयांतुन**
**अर्थ निपजतो का हो त्यांतून**
**अव्ययांतुन अव्यक्तांतुन**

तो अर्थ, ती सार्थकता मी सांगण्याचा प्रयत्न आत्मीयतेचा असला तरी प्रमाणाला धरून, अशी प्रामाणिकता त्यांत आहे. अव्याजतेचें अन् निष्कपटतेचें नातें आहे.

**त्या अर्थाच्या सार्थकतेचें**
**नातें जडलें या विश्वाचें**
**विश्व उपजतें अस्पष्टांतुन**
**अव्याज अशा निष्कपटांतुन**

ज्याचें त्याला निवेदन म्हणून हा पुरस्कार संपवितों.

नाशिक **—सोपानदेव चौधरी**

दि. २०–७–१९६७

## कोडें

'अ-ब-क-ड' मी पढलों,
त्रिकोण चौकोन शिकलों,
तरी कोडें न सुटतें—
'बिंदु' कोणा म्हणावें तें

बिंदु वाटोळी त्रिज्या फिरते
मग एक चक्र गरगरतें.
घाणीचा बैल आंधळा फिरतो
परि त्याचा बिंदु न त्याला कळतो

रहाट-गाडगें चालतें
पाणी वर तें खेचतें
अनेकां तहान भागवितें
परि त्याला नकळे बिंदु कोणा म्हणावें तें!

बिंदु बिंदु मिळोनी सागर बनतो
त्यांत मानव गोते खातो
त्याला अन्त ना अजमावतो
बिंदु जवळ येतो, तों दूर दूर जातो

हा असेल का बिंदू
तो असेल का बिंदू ______

येथें असेल का बिंदू
तेथें असेल का बिंदू
परिघांत भ्रमण आमुचें तें—परि कोडें न सुटतें

१७-१२-६२

## शून्य

जेथें तेथेंच फिरतें
पुढें न सरसावतें
मुळी ना गति घेतें
गोल गोल तें असतें

आदि ना अंत त्याला
कोणी म्हणेल माया त्याला
अनुस्वार तें ठेवतें
उठतें वठतें परि न ठरतें

जरि पूज्याचि असतें
किंमत घेतें भाव चढवितें
मान उंचावतें मान उभारतें
जेव्हां अंकामागूनी तें येतें

ओसाड, उद्‌ध्वस्त, नग्न, विवस्त्र
गणिताचें परि एकचि अस्त्र
"नास्ति नास्ती" म्हणोनि सामोरें येतें
परि अस्तित्व पटवतें, मागुतें न जातें

माया बाजारीं वसती
शून्य दृष्टी त्या म्हणती

शब्दब्रह्म शून्याकार ह्या बोलती
साक्षात्कारी पुण्यश्लोक ऐसेच सांगती

शून्यचि तें गूढ शून्यचि विश्ववनीं
नका शोधूं त्या शून्याच्या हो खाणी
उंबराचें फूल देखिलें का कोणी
जाणतो एकच विश्वाचा या धनी

२०-१२-६२

## बाभळकाटा

उदास झाला मनीं एकटा बाभळकाटा
येई न कोणी त्याच्या वाटा
त्याला वाटे मी एकाकी
कोणी न येई मजपाशीं कीं
पक्षी न बसतो माझ्या ङहाळीं
ससा न येई मजजवळीं
मूक असोनीं प्रेम न त्यांना
शेळ्या बकऱ्या तशाच माना
अन्हेरती मज न ये कल्पना
एकटाच मी असाच सुना
तोडुनीं मजला कुपण करिती
म्हणुनीं तुमच्या वाटा अडती
कोणि न येई जवळीं परि तें
दूर दूर हें जग मज पुरतें
जवळिक नाहीं कोणीहि केला

पण एकदां भलतीच गम्मत झाली
अन् आतांच मला ती आठवली
सांगूं ! माझी कळीच हो फुलली
झिल्लिण कन्या जवळुनि माझ्या जातां जातां
लागला तिजला माझा कांटा
पदन्यास ती करुनी खोटा
म्हणे " मी गो चुकलों वाटा "

ऐकुनी श्रवणीं तिच्या वेदना
उठल्या मन्मनीं मधुर संवेदना
मजला वाटे मीहि मोठा
न मुळीं खोटा; उदास ना मी
मुळीं न एकटा

२०-१२-६२

४३६७८ काव्य
१७५०
२७/१२/६८

**तो**

मी देतों इंजेक्शन्
तो म्हणतो हायरे
मी मागतों पैसे
तो म्हणतो बापरे !

**ती**

मी तिला तपासतों
ती म्हणते इश्श
कडू गोळ्या देतों
ती म्हणते बस्स !

**तें**

मी पोर तपासतों
रडून रडून झालें बेजार
कांहीं समजलें नाहीं
मी म्हणतों "हा काय आजार !"

६-१-६३

## वारकरी

वारकरी आम्ही वारकरी
घेऊन पताका खांद्यावरी
जाऊं एकलेच पंढरी......जाऊं॰

गेले तुकोबा त्या वाटेवरी
ठेवून पाऊल पावलावरी
जाऊं एकलेच पंढरी......जाऊं॰

निघालों येथून सामोरी
वाट जरी ती काटेरी
जाऊं एकलेच पंढरी......जाऊं॰

वैखरी हरिचा गजर करी
साथ आम्हां एकतारी करी
जाऊं एकलेच पंढरी......जाऊं॰

वंदू जो रखुमाई वरी
उभा ठाकला विटेवरी
जाऊं एकलेच पंढरी......जाऊं॰

अनवाणी झुकेले जरी
निर्धारिच असुचा तरी
जाऊं एकलेच पंढरी......जाऊं॰

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ........
संदर्भ शाखा

माळकरी अन् वारकरी
असत्याची न कास धरी
जाऊं एकलेच पंढरी.....जाऊं०

अम्हां कसली न कदर तरी
तो अमुचा सांभाळ करी
जाऊं एकलेच पंढरी......जाऊं०

एकटेच जन्मा आलों तरी
आम्ही सर्वच यात्रेकरी
जाऊं एकलेच पंढरी......जाऊं०

१८-१-६३

## शुभाशुभ

पाल चुकचुकली — कांहीं तरी वाईट होणार
मांजर आडवें गेलें — नक्कीच तसें घडणार
डोळा लवतो आहे — खात्रीच झाली आहे
पण अशुभाची न् माझी — गाठ पडलीच कुठें आहे !

११-२-६४

## वेडा कवडसा

एक कवडसा
मला न विचारतां आंत येतो

खोली माझी उजळुन पाहतो
मला संकोच वाटतो
हा परका माझ्याकडे कां आला ?
विचारूं ? काय हवं ! कसं विचारूं ?
असा विचार मनांत येतो

तोंच निघून जातो
काय वेडा पिसा आहे
कीं मला वेड लावतो आहे ?

११–२–६४

## रेशमी धागे

लिंबोणीचं झाड, त्याला चिऱ्याचा पार
त्या पारावर खेळूं, साखळीचा हार
लांब साखळी, अमची हळू हळू फिरे
लहान लहान हातांचा घेर गोल गोल सरे
आम्ही कशा पाठच्या बहिणी हातांत हात
परकराचे सोगे खोवूं, तुमच्यावर मात
सोनेरी झिपऱ्या पोरी बांध त्या जरा
डोळ्यावर आल्या तर बिघडेल ना तोरा
अग अग बनचा भाऊ बघतो कसा
बघ, बघ, सोनियाचा राजा शोभतो जसा
काजळ तरी घालून यायचं होतंस
आम्हांला गुपित सांगायचं होतंस
जिवाभावाच्या मैत्रिणी सगळ्याच आपण
आजन्म एकमेकां करूं या राखण

१२–२–६४

# उदधि

| | | | |
|---|---|---|---|
| अगम्य | अगोड | अजब | अवीट |
| अफाट | उफाड | विराट | सपाट |
| अजस्त्र | अस्थिर | गंभीर | पिसाट |
| कठोर | खटयाळ | खंबीर | सुसाट |
| चंचळ | भंडार | चटोर | पातळ |
| निर्मळ | पवित्र | स्नेहाळ | सोज्वळ |
| तेजाळ | शीतळ | निळ | चोरवट |
| फेसाळ | दुधाळ | तांबुस | हिरवट |
| चावट | हेकट | अजोड | उजाड |
| आगम | निर्गम | केवळ | राकट |
| दर्याचे | उधाण | तुफान | ओळ |
| फोफावे | उफाळ | अकाळ | विकाळ |
| निळसर | धूसर | चपळ | नव्हाळ |
| मुळींच | कधींच | नाहींस | गचाळ |
| आनंदी | उल्हासी | अर्भक | भासरी |
| सरिता | वरितां | आधार | करिसी |
| शुद्ध | सात्विक | तळाला | मौक्तिक |
| किनारीं | कोरळ | मासोळ्या | कितीक |
| अखिल | जगता | वेढून | टाकितां |
| मानव | तोकडा | भासतो | पुढता |
| खवळे | शिंपले | काढळे | म्हणून |
| प्रवासी | करतो | देवाण | घेवाण |

महीधरांचे सतत चरण धुऊन
तरंगे त्यावर हांडीचें निशाण
ठाकला किनारीं हालत डुलत
बागडे नाचत सुंदर सुरत

मेरू पर्वताची रवि उभारून
देवें दानवें करून मंथन
अमृत शोधून घेतलें प्राशून
शेषानें मांडलें झोपण्या आसन
त्यावर विष्णूनें आरूढ होऊन
काळानें ओतलें उधाण ज्यांतून
ओहोटी भरती दाविती निदान
क्षितिजा चाटतें चोखतें अस्मान
अथांग सागर निळा रत्नाकर
मानवें नमिला होउनि किंकर

कोळ्यांचे जीवना तूंच रे आधार
पोषण करण्या त्यांचें रे निधान
किनारीं किनारीं वसती करिती
तुजला नमून जीवन जगती
तूंच रे तयांना एकच विसावा
म्हणती सागर जवळ असावा
तुजला एकटें ब्रह्मांड मानिती
शतकें शतकें तुलाच भजती
करुणा तुझीच सतत भाकती
आर्जवून तुला मीठभाकरी खाती
असेंच कित्येकां जीवन देतोस
मासे खेकडे यांना पोसतोस
जीवा जीवांना राखण आहेस

जगता पारखा कधींच नाहींस
अमाप भांडार पोटांत ठेवतां
अखिल मानव मानीती देवता
नमून तुजला नारळ आर्पिती
प्रसन्न मनानें देती पावती
एकच पूर्णिमा वार्षिक येते ती
महत्त्व तुजला देऊन जाते ती
नमन करून तुझी रे आरती
नंतर मुहूर्त करून सोडती
वर्षाकाळीं होड्या ज्या बांधती
व्यापार करून जोडीती संपत्ती
भजून तुजला सुखानें नांदती
जवळ करिती भाग्यलक्ष्मी ती

काठावर तरंग तुझेच नाचती
त्यांसंगें झावळ्या ताल त्या धरिती
म्हणून नारळ तुझ्याच जीवनीं
पावला महत्त्व स्वतांला घेउनी
जाळ्यात जीवन खारवी ओतलो
म्हणून सतत सुखी तो असतो
अहर्निश खपत म्हातारा होऊनी
आपुला वारसा मुलाला देऊमी
सांगतो सागरा पितर मानोनी
मनींच्या अशाच भावना ठेवोनी
पुजत भजत काळ कंठीत
असाच जगत रहा सतत
सामिंदर सहस्र हातांनीं रे देतां
किती म्हणून घेशिल दो हातां

| | | | |
|---|---|---|---|
| राहू | केतूनें | ग्रासतां | चंद्राला |
| होतात | वेदना | तुझ्याहि | मनाला |
| तुझा | जीव | होतो | वरती-खालती |
| अक्षय | तुझ्या | लाटा | हेलावती |
| स्थीर | ना कधीं | तूं | निश्चल-बससी |
| उतावळा | जणूं | तरुण | शोभसी |
| दधि | क्षीर | घृत | शुद्धोदक तें |
| क्षीर | सुधा | इक्षुरस | सप्तसमुद्र असे तें |
| जोडले | सप्तद्वीपा | मेखला | अशी ती |
| तरल | विरल | सप्तसूर | झंकारती |
| उदकराशि | यापरि | एकच | भांडार |
| उदधि | जलधी | भरलें | कोठार |
| पूर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
| समुद्र | चतुष्टय | भरला | अपार |
| अवनीचे | स्कंधीं | खेळतां | खेळतां |
| पाताळीं | दडे | बघतां | बघतां |
| अतल | वितल | सुतल | पाताळ |
| रसातल | महातल | सप्तपाताळ | तलातल |
| या विरल | वस्त्राचा | शालू | नेसून |
| धरणी | फिरे | दिनरात | सुखावून |

१४-२-६४

## सडकेवरची कडक लक्ष्मी

सटक, फटक घो घो घुम
कडकलक्ष्मी नाच गो धुम
झिंट्या चिंध्या माखलं कपाळ
दंडावर रक्ताची चिळकांडी लाल

दुडकत दुडकत थय थय नाच
डोईवर देवीचा तोलून माच
थुई थुई-हातपाय हलव हलव
पुढं मागं डोकं डुलव डुलव

पायांत घुंगुर छुम छुम तुझ्या
कमरेंत घंटा नाचते मजा
माथ्यावर डोलारा लटलटतो
तण तण नगारा कडकडतो

छातींत धडकन धडधडतं
आंगांत साऱ्या कुडकुडतं
रुक्ष रुद्र लाल कटाक्ष
भेदरून सांगतो देवीसाक्ष

रात्रीं झोपेंत घाबरतो
आईला जाऊन बिलगतो
नको मिशाळजी बागुलबोवा
फटके मारून हाकुन लावा

१–३–६४

१५५०
काव्य
२८/१२/६८

शब्दांच्या मेखले विश्वच वेढलें
'शब्द' अर्थानें या जग हें जोडले

शब्दांची किमया वेद हो वदले
'ॐ'कारें स्वरूप सुंदर घेतलें

शब्दें जीवन रममाण केलें
साहित्य सर्वच साकार हें झालें

शब्दे नव्हाळें नाट्य निर्मियेलें
शब्द अमर संगति बोलले

आर्त पीडितांना शब्दच अमृत
हृदय हेलावे होवोनि अमृ-त

६–४–६४

## भ्रम

काँहीं काँहीं कळत नाहीं
का आम्ही वळत नाहीं

गती मात्र घेत फिरतों
प्रगती कधींच करीत नसतों

कृति सर्वच करते झालों
आकृति कशी ती नाहींच न्यालों

स्मृतिनेंच गाडें चालते आहे
विस्मृतिनेंच चाक अडतें आहे

सक्ति कोणी केली नाहीं
आसक्ति मुळीं वाटलच नाहीं

चेतना सर्वत्र नांदत आहे
अचेतन शरीर स्वस्थ आहे

१५-१-६५

## विकृत

तुटलेलें फुटलेलें
  बघण्याची हौस मला
नाद मला छंद मला
फुटलेल्या पाटीचा
तुटलेल्या धाग्याचा
पडलेल्या भिंतीचा
नाद मला छंद मला
  बघण्याची हौस मला

भुंकणारा कुत्रा तो
मळलेला कपडा तो
सलणारा कांटा तो–
  बघण्याची हौस मला
नाद मला छंद मला—
    तुटलेलें...

आकाशीं अभ्र जसें
गहिरेपण नासतसे
कुरतडुनी पान तसें
पंखहीन पक्षी जसे–
  बघण्याची हौस मला—
नाद मला छंद मला...

रोगट शरिराचा
मनिंच्या विकृतिचा
दृष्टिहीन मनुजाचा
पर्णहीन वृक्षाचा–
नाद मला छंद मला
बघण्याची हौस मला––
तुटलेलें फुटलेलें...

हौस मला वाटेना
प्रेम पहा गवसेना
विटलेलें मन माझें
असंतोषि जग माझें
बघण्याची हौस मला—
नाद मला छंद मला
तुटलेलें फुटलेलें
बघण्याची हौस मला...

## बर्लिनची भिंत

दूर दूर सतत राहुनी
आठवण तुझी जवळ ठेवुनी
हुरहुर परी मनीं लागते
जवळीक तुझी सतत वाटते

सूर तुझा तो कानीं रूळतां
भाव परी तो दूर रहातां
वेदना मनिंची कुणा कळेना
वनवास सदाचा कां पळेना

किती साहूं या मनी यातना
केंव्हां येईल काळा करूणा
नव्हे नव्हे तें मनीं येतसे
अगतिक होउन ध्यास घेतसे

भेरी तुतारी जरी भिववितें
कोणी न तोडील अपुले नातें !
या कांटेरी कुंपणांतुनी
वाटे यावें उडी घेऊनी

दगड उभे हे घट्ट खेटुनी
नाते अमुचे पार ठेचुनी

निधड्या छातीचे हे पत्तर
दया न त्यांना अगदीं निष्ठूर

दगडाच्या या भिंती पलिकडे
जुळेल अपुलें नाते तिकडे
तोंवर पाहीन वाट तुझी तर
घडे न अपुले मीलन जोंवर

हिणकस माणूस निर्मि अडथळा
मृत्यु सोडविल अपुली अवकळा
त्या काळाच्या भिंती पलिकडे
थाटूं जीवन पुन्हां संवगडे

२३-२-६५

## नववधु

सूर्य ठेवुनी साक्षीला हा
आज वरिलें मी तुला
सात पाउलें वाट चालुनी
धरलेंस तूं हातीं मला

सोडूनी मायद्वार मी
तुझ्याशी समरूप झालें
प्रेम सारे वोतिलें मी
तुझ्यास्तव नांवहि टाकूनि आलें

पदराची अन् शालुची गांठ
मारली कधीं न ती तुटणार
हेंच माझें माझें म्हणोनी
मी नव्या घरीं रमणार

२७-२-६२

# निवडुंग

व्यथा मनींची कुणा कळावी निसर्ग निष्ठुर मजपरता
काटेरी अन् राकट असुनी रानटी मी स्वभावता

मैना झुलते खांद्यावर मम गुंजी घालते पाकोळी
आळे विणुनी मम वाटोळें सोबत करतो मज कोळी

शेताभवतीं कुंपण करुनी एकटाच मी उभा सदा
अरण्यरुदन हें माझें चाले किती तरी आपदा

लाल फुले जरि शोभा देती कधी कुणी ना त्यां शिवती
भाग्य न माझे जाई जुई परी हार कधी ना गुंफिती

एकाकी अन् रडवा तरीहि ताठा माझा लोपेना
पवन खेळतो मजसंगे तरी झुलतों ना मी नाचेना

कवडी मोल हें क्षुद्र जीवन जगता आला वीट मला
काटेरी हें जीवन माझें नको नकोसे जगताला

७–३–६५

## अळूचं पान

अळवाचं पान – त्याचि ग शान
डुलडुल डुलते – त्याची मान
एकच दांडा – एकच पान
सौंदर्याचा त्याला मान
पाणी न ठरे – भूरभूर सरे
चांदिचे छरे – पडतात छान
उभं जोडी जोडीनं – हलतं लाटे लाटेनं
सारं सारं माळरान – ऐकत त्याचं गोड गान
लहानांत लहान – महानांत महान
हरपलं भान – काय ग पान
अळवाचं पान – त्याचि ग शान
किती किती छान – पानांत पान

८-३-६५

## बेडकीचं लगीन

लगीन ठरलं बेडकीचं
वऱ्हाड जमलं केव्हांचं
मोठा बेडूक व्याही
त्याची गडबड नाहीं
हुंडा देता ना हो राव
विहीण करी डराव् डराव्

बेटकुळीला वाटते लाज
सासरीं जाणार आहे आज
शेवाळीची खीर केली
जिभल्या चाटित सासू प्याली
चिखलांत मांडव घातला
वाहुन गेला सगळा

वऱ्हाड हललं येथून
गडबड जेथून तेथून
तरी मुहूर्त साधला
जावई घरा गेला

८-३-६५

## वाऱ्याचा चाळा

वाऱ्या अंगीं वारें भरलें वारयोषितेचें
दौलत लुटतो माझी सारी टोक उडवुनी पदराचें

फुलें उडालीं माळलेलीं नासली सारी हौस
गालबोट लागलें यौवना करुनी विध्वंस

त्या वाऱ्याला वळणीवर आणी आषाढाचें पाणी
चिंब भिजले ओलेती मी वनमाला राणी

उडतां अवखळ हातीं धरुनी आवरलें वसन
पण आतां होतें नको नको तें दुष्टांना दर्शन

१०-३-६५

## ज्योतिषी

रस्त्याच्या कडेवर हात पहातो ज्योतिषी
म्हणाला "नशीब फार जोरावर"
तिथून उठलों तों धडक पाठीवर
अन् जागा झालों इस्पितळांत खाटेवर

## बटाटेवडा

कर्जतच्या स्टेशनवर चवदार बटाटेवडे
ते बनवतात ज्याच्याकडे
तो घेतो पीठ गिरणीवाल्याकडे
आणि तेल, शनिवारीं मारुतीच्या पुजाऱ्याकडे

१७–३–६५

## वंचना

( मातृहीन मुलीने आत्महत्येचा प्रयत्न केल्यानंतर )

निर्माल्यापरी तनू गोजिरी कां फेकुनी देतेस ?
देवे दिधला ठेवा हा तूं सोडून कां जातेस ?

माता बनुनी पिता होत तुज कौतुक किती होतसे
तूं कां गेलीस टाकून सारे, तुझे कुणी का नसे ?

तूंच होतीस एक आशा त्याची, जीवन हे जगण्या
तू कां झालीस उतावीळ गे मातेला भेटण्या ?

तुझा प्रियकर खंदा असुनी आज लव्हाळा बनला
आग पेटली हृदयीं त्याच्या, त्याने ओलावा टाकला

उपाय सारे फसले, तूंही फसविलेस त्यांना
कुणी कुणाला दोष द्यावा, कां केलीस तूं वंचना !

१८-३-६५

## आम्ही देहूकर

संत येत बहुत जन्मा, तुका एक ठाउक आम्हां
आम्ही गाऊं त्याचें नाम, तरले अभंग त्यांचे प्रेम
ध्यानीं मनीं एक तुका, वाचोनी जन्म सारा फुका
टाळ वाजे जेथें दिनरात, वेडावली वैष्णवांची जात
इंद्रायणी आम्हां गंगामाई, तिचे गूण देहू गाई
देहू आमुचे आहे माहेर, तिथें अमृतकणांचा अहेर
तुका संताचा कळस देवा, आम्हां क्षुद्रांचा तोच
विसावा
तुळशीमाळा आम्हां अलंकार, करूं तुक्याचा
जयजयकार

१८-३-६५
'तुकाराम बीज'

## जीवन तुकामय

आम्ही देहूचे देहुचे : तुका आमुचे आमुचे
मुखी अभंग गातां गातां : शेत पाजतां पाजतां
प्रेमे रंगतों रंगतों : आम्ही आनंदे नाचतों.
पहाटे दळतां दळतां : तुका सांगाता सांगाता
तेल गाळतां गाळतां : रसना तुकामय होता
बुधला भरतो भरतो : आकंठ तुका ओसंडतो
कडबा पिसतां पिसतां : उभा तुका सभोंवता
मोट चालतां चालतां : शाळू डोलतां डोलतां
काळ संपतां संपतां : तुका हात देतो हाता
अणू रेणूंत भरला : तुका भरून उरला

३०–३–६५

## चहाची आवड

इवली इवली माशी
फडफड करीत
दुधाचे पातेलविर
बसली खुशींत

अशी ही माशी
करी बदमाशी
तिथें पाहून तिला
किळस आली मला

शिसारी आली दुधाची
कधींच नाहीं प्यायची
आई म्हणे वेडे पोरी
दूध प्यावें जरा तरी

नको नको आई मुळीं
नाहीं आतां दूधखुळी
म्हणशील चहाटळ
पण चहाच ग निर्मळ

२५-३-६५

## देह एक मंदिर

मंदिर एक सनातन अपुलें
आत्म् अस्मिता तिथें फुले
तसेंच मंदिर शरीर सुंदर
आत्माराम स्थिर निरंतर

या हृदयाच्या गाभाऱ्यांतुन
उठती लहरी नित्य सनातन
साकार मूर्तीला अपुल्या आपण
अंतर्यामी बघूं लावूनी लोचन

प्रतिबिंब स्वतःचें पूर्ण निर्मळ
निश्चल कातळ जैसा जळतळ
अचल ठेवूनी अपुली श्रद्धा
शरीरीं अपुल्या मंदिर बांधा

१३-५-६५

## भूलभुलय्या

आमचें विश्व असतें वेगळें
त्यांत जातों आम्ही दंगून
नव्या नव्या चित्रांच्या
भूलभुलय्यांत पुरे रंगून

तेच आकाश काळें निळें
दिसते अगदी जगावेगळें
कधीं उंच कधीं ठेंगणे
हातांत येतें वाटतें आगळें

तेंच तारूं तेंच शीड
वारा भरून सुसाटा
तोच सागर त्याच लाटा
त्यांत शोधतों नव्या वाटा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वत्व
अनुक्रमांक ४५९२८ वि: काव्य
क्रमांक १८०८० नों दि: २४/१२/

तेच प्राणि तेच पक्षी
दिसतात मात्र अगदीं नवेच
तेच वृक्ष तींच पानें
रंग त्याले तुम्हा वेगळेच

आमच्याशी बोलतात तेव्हां
वाटते आहेत साफ खुळ्या
तींच फुलें त्याच कळ्या
हसतात खेळतात जगावेगळ्या

तेंच बालक तीच स्त्री
नाजुक सुंदर अल्लड भासते
गोड गुंजन डोळ्यांतून
एकसारखे करीत असते

ओबड धोबड वाटा त्याच
डोंगर-कपाऱ्यांतून फिरतात
मंत्रमुग्ध करून जशा
पायघड्या मऊ वाटतात

त्याच पाण्यावर तेच बुडबुडे
ओहोळांतले तेच खडे
अंगुर तसेच जाडे भरडे
त्यांना पहात होतों वेडे

तेंच जग तुम्हीं आम्ही
अगदी तसेंच पहात आलों
जगावेगळा अर्थ त्याचा
आम्ही आपले लावीत आलो

तेंच मन वेडें पिसें
धांवत सुटतें नको तसें
त्याला नाहीं पाहातां आलें
कोपऱ्यांत जाऊन रुसून बसलें

२९-१०-६५

## चौपदरी माधुकरी

धर्मवेड्या भाबड्यांनीं घातले सुके चतकोर चार
ॐ भवती शिदोरीवर, मी झालों मोठा फार

वणवण केले उन्हातान्हांत भिक्षांदेही पडली घशांत
उगाच खाल्ले घास कोरडे, थैमान चालतें माझ्या
मनांत

मगरूर अन्न नको होतें, घामट आशा दटावीत होती
धर्ममार्तंडांची भुतावळ, मला काकबळ देत होती

२९-१०-६५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९६९५८

माणसें माणसें

माणूस इथून तिथून एकच - कोठे असो कसा असो
उत्तर ध्रुवावर
हिमाळयावर
टिंबक्टूला
नागासाकीला
कळंदर असो, धुरंधर असो
मध्यांतरांत
निरंतरांत
अर्धांतरांत
युगांतरांत
बिलंदर असो, शिकंदर असो
माणूस जेवढा तेवढा एकच -- कोठे असो कसा असो

३-११-६५

## दुसरेंच पान पालवलें

काटेरी कुंपणांत माझा हात अडकला
फूल गेलें निसटून व्रण मात्र राहिला

व्रण अजून झोंबतो आठवण करून देतो
मनांत काटा रुतून आहे, तो परत टोचतो

व्रण गेला आठवण गेली पार पार विझून
दुसरेंच पान पालवलें कळ्या पाकळ्या फुलू

६-११-६५

## मूर्ती-शब्दमूर्ती

नवें पान नवी शाई
नवा शब्द सुचत नाहीं
त्या शाईची निळाई संपली
मन कसें हरखून गेली

नवे शब्द मनीं उमटतात
हात कसे जखडून टाकतात
नव्या जगाचा पाईक मी
आकार मात्र घेत नाहीं

छिन्नी हातोडी हातांत घेतली
नवी मूर्ती साकार झाली
तीच आतां बोलूं लागली
नवे शब्द वठवूं लागली

६-११-६५

## गानलहरी

एक अनवट राग आला तुझ्या सुरेल गळ्यांतून
लाटा त्याच्या उमटतात मनाच्या तळ्यांतून

येईल का पुन्हा गातां तोच राग तसाच आतां
थांब, नको गाऊं, तरंगू दे पुन्हा पुन्हा त्याच लाटा

एकामागून एक येतलि संथपणें गोळाईतून
परिवर्तन त्यांचें होईल तुझ्या माझ्या दिलांतून

पाणी नितळ संथ होईपर्यंत, पुन्हा लाटा नको
प्रतिबिंब दिसेपर्यंत पाण्याची चळवळ नको

७-११-६५

**रसगंगाधर**

श्रुतीमनोहर रसगंगाधर आलापी उठली
स्मृतीपटावर तारा छेडित पुन्हा पुन्हा वळली
पुराणोक्त नच होत बघ वर्तमान ती आठवते
फलप्राप्ती रस जिव्हाग्री मधु माधुरी चाखवते

सत्यालापी मृदंगावरी मुखलेप तो काजळ
शिवम् भावी वीणा वदते सूर षड्ज मंगळ
सुंदरशी ऊर्मी उठते आसमंत भारावुन
त्रिगुणांचा मिळाफ झाला मन हें हेलावुन

११-११-६५

## प्रसवली केळ

एक केळ प्रसवली
सोनकेळीचा पिवळा फणा
केतकीसारखा धमक रंग
अजून त्याच्या मनांत खुणा

दोन केळी उंबऱ्यावर
जुळ्या बहिणी शोभतात
मिठी मारून डोकें टेकून
मंगल तोरण बांधतात

आगोतली आडवी बसते
पूर्ण ब्रह्म त्यावर जेवत
सकाळ सायंकाळ तुपाची वात
तेथें तेज तिचें तेवत

केळफूल फुलले लाल लाल
पारिंत त्याच्या पराग खूप
डोक्यावर पानांचा फरा
आधार करतो गूपचूप

केळीचे दांडे मांडीसारखे
आधार देतात यौवनाला
गंमत सांगतो कानांत तुझ्या
सांगू नको कधीं तिला

१२-११-६५

## हातांत हात तुझा माझा

काय हवें आहे मला - नव्हतेंच कळत त्या वेळेला
हातांत हात फक्त हवा - जुळवून तुझ्या बोटांत घावा
तूं जवळ असावीस - म्हणून झालों कासावीस
कर दया माझ्यावर - हसून मोकळ्या माळावर
तूंच मला बिलगावीस - वेलीसारखी लटकावीस
डोळ्यांत येऊन बसावीस - काळीं कबुतरें चोरावीस
तेव्हांपासून पानामागून - फिरत यावें तूं नाचून
गिरकी मारून टांचेवर - पदर पकडून निरीवर
कळत असेल आतां तुला - एवढेंच हवें आहे मला
हातांत हात घेऊन माझा - जतन कर ठेवा तुझा

## मातीच्याच चुली

युनोच्या मंचकावर देशोदेशींच्या बाहुल्या असतात
एकमेकींचे सूर एकमेकींत प्रयत्नानें मिळवतात

त्यांतली जर एकादी बोलली असंबद्ध
तर तिला दम भरतात, " तोडूं संबंध "

गोऱ्या काळ्या तिरमिरतात हातवारे उगारतात
पिवळ्या बाहुलीला " जवळ बसूं नको " म्हणतात

एकत्र संसार मांडून असा,
चुली वेगवेगळ्या मांडतात
पण घरोघर मातीच्याच चुली म्हणून म्हणतात

१४-११-१९६५

## मानव गातो अपुलें गाणे

वृक्ष उभा अश्वत्थाचा
इतिहासाचा साक्षीदार
पार त्याचा झिजून आतां
काळ करी आधार

काळाचा आधारस्तंभ तो
मानवतेहून मोठा परि तो
पिढ्या पिढ्यांची कहाणी सांगत
गतकाळींच्या गोष्टी रंगत

ज्ञानेशांचें पुण्यभूमीवर
पानीपतचे रणभूमीवर
सावली केली ज्या वृक्षानें
मानव गातो त्याचें गाणें

विशाळ स्मृतीचा अबोळ ठेवा
घेत, पारंबयांचा आधार नवा
विशाळ बाहु विशाळ नेत्र ते
विशाळतेचे भव्य पुत्र ते

पानोपानी डोळत खेळत
अस्वस्थाच्या गोष्टी सांगत

स्थावर तिष्ठत जंगम जगवीत
निसर्गाचा साज सजवीत
ऋतुपर्णाच्या पर्णशिखा त्या
ऋषितुल्याच्या धवल जटा त्या

हिमालयाच्या कथा रंगवीत
सागरतटींच्या लाटा मोजीत
कणाकणांतुन उभें तरुणपण
वार्धक्याचे ना मुळी लक्षण

मुनीवरांच्या सावलीखाली
क्षुब्ध मनुजता विसावलेली
गत कालाची स्मृति न तिजला
अश्वत्थ उभा परि साक्षीला

अव्ययाच्या त्या साक्षीनें
मानव गातो अपुले गाणे
मानवतेच्या विशालतेनें
मानव गातो विशाल गाणें

२६-११-६५

## न्यूटन एक कण

आपण ज्याला मानला हिनकण
चेला न्यूटन त्याचा, टाकून अहंपण

न्यूटनला वाळूचा एकच कण
गेला धडा देऊन एकच क्षण

कणाकणागणिक कण झाले
न्यूटन कांहीं क्षणोक्षण नाहीं जन्मले

तरी एकच कण न्यूटन पण
देऊन गेला मानवाला विशाळ शिकवण

२०-१२-६५

## राम म्हणा

निसटत्या अंगाची
वस्त्रहीन वेदना

मरणाच्या वाटेवर
चालणारी करुणा

उघड्या कुडीत
थंडावत चेतना

अंधुक ज्योतींत
छपणारी प्रेरणा

तेजोवलयांत विलीन होत
राम म्हणा राम म्हणा

२२–१२–६५

## एकांत

या एकांतीं येत अनुभूती : कधीं न आली यापूर्वी ती
वाटा फुटती चहूंकडून : जात त्यांतून एकांतांतून

एकांताची अशीच संगत : अन्तीं असतां अपुल्या सोबत
तमा कुणाची एकांताची : ही समाधि अंगाविण्याची ?

## वेगळा

पांढरा कावळा काळा बगळा
काळा बगळा असेल का?
नसेल तर विचार आला
असा कसा एक वेगळा

आज या जगांत कांहीं
नाहीं तसें नवें दिसे
म्हणून उगाच वाटलें असें
वेगळें पण असेल कसें!

२२-१२-६५

## वास्तु जीवनाची

खोल जीवनांत उजेड अंधार
ऊन सावल्यांचा खेळ ओटी-दार

माजघरीं दाटलो काळोख नुसता
अंतरीं केवळ व्यथेचीच कथा

देवघरामध्ये तेवतें निरांजन
निर्मळ नजरेंत भरतें अंजन

स्वयंपाक सिद्ध सात्त्विक होतसे
विपाक त्यांतच पूर्ण गवसतसे

परस-दारीं तुळशी वृंदावन
शोभत मंजिरी हास्यवदन

प्रांगणांत फुले सुगंधी फुलोरा
उदंड जीवनीं रंगतो डोलारा

२३-१२-६५

## ओलेती ओढ

शतधारांनीं भिजली रमणी
अंगीं चिकटली ओली ओढणी
दिसे यौवना नटली सजणी
हलक्या फुलक्या पोपटपानीं

शोक वृथा कां ? अश्रू नयनीं
ओलेती अंतर्मनीं जशी वरकरणी
तिला पाहुनी द्रवलों मी मनीं
शिथिल-गात्री पिकल्यापानीं

निष्ठा मनिंची तशीच अजुनी
अष्टोत्तरी मी ओढित स्मरणी
ओढाळ जातीचा अशा प्रकर्णीं
खंत मुळीं ना पुन्हा उजळणी

चटके करिती काहिली तनूची
तरी न विझली ओढ मनींची
ज्वाला पेटली चुंबित सरणी
भिजलों मीही ओल्या पानीं.

२४–१२–६५

## तिरकस आशय

तिरकस ऊन तिरकस सावली
तिरकस नारी त्यांतून आली
तिरकस पोलका थाट तिचा
त्यांतून उतून वहात होता

तिरकस बांधा गोल तिचा
तिरकस अंग तिरकस चाल
चाले तिरकस तीरहि मारित
तिरकस नजर खोल तिची

सरळ असे तें कांहीं नाहीं
बोलणें वागणें तसेच तिचें
तिरकस प्रियकर हेरला तिनें
त्यानें या तिरकस आशयांतून
सरळ केलें तिचें जिणें

१४-१२-६५

राठी संग्रहालय,
अनुक्रम दि:

## करार

कृतांता, ये केंव्हांही तूं अतां
स्वागता तयार मी रे अतां

कधीं न वदलो खोटें नाटें
ना कधीं रसाळ अन् गोमटे
तर्कशुद्ध परि तसें चोखटें - वदलो मी रे सदा

कलुष ना मी केलें कधिंहि
कुश्मांड नाहीं रचिलें तेंहि
कृतघ्नताहि नाहीं नाहीं - शिवली मज रे कदा

कुमंत्र नाहीं दिला कधींही
कपट केलें नाहीं कुणाहि
कलंक ना या गेही देहीं - विटाळ ना मज कदा

कळ न लाविली केंव्हांही ती
कणव साऱ्या देहां भूतीं
कृत निश्चय मी हा अतां - करार करतो अतां

२४-१२-६५

## अर्थ विश्वाचा

समीक्षकांच्या समीक्षणांतुन
उमटती रेखाकृती तयांतुन
अर्थ निपजतो का हो त्यांतून
अन्ययांतुन अव्यक्तांतुन

त्या अर्थाच्या सार्थकतेचें
नातें जडतें या विश्वाचें
विश्व उपजतें अस्पष्टांतुन
अन्याज अशा निष्कपटांतुन

२६–१२–६५

## एका वर्तुळांत

चौकटीच्या चौकड्यांतून निसटलो
त्रिकोणाच्या त्रांगड्यांत सांपडलो
वर्तुळाच्या चक्रांत अडकलो
चक्रम बनलो, भांबावलो

त्रिकोण चौकोनानें वेढले
काटकोनांत असहाय अडवले
समांतर करण्याकरितां पकडले
अन् सरळ सरळ रेषेंत आणले

२६–१२–६५

## तोरा वाऱ्याचा

अडेल वारा पडेल वारा
काय वाऱ्याचा पण तोरा
धिटाईनें छेड काढील
डोळ्यांत धूळ फेकील
शिडें उभारील शिडें पाडील
झाडें उन्मळून पाडून टाकील

वाऱ्याला ना लागत थारा
वारा जातो सैरा वैरा
यज्ञवेदिवर खेळेल
सरण चितेवर नाचेल
हळुवार पदरांत शिरून खेळेल
रागावला तर पदर फेडील

चपलख वारा छिछोर वारा
अवखळ वारा चपखल वारा
जखम शिंपून हळुवार
फुंकर घालील गार गार
काळ्या भुऱ्या केसांत नाचेल
थिल्लरपणा करून हसेल

## अक्षर ओळख

शिक्षक बनून देशिल शिक्षा
साक्षर करून देशिल दीक्षा
नको मज इतुकी थोडी भिक्षा
हव्यास मोठा मोठी अपेक्षा

ज्ञानेशांनीं भिंत चालवुनी
किमया केली ती पाहुनी
थक्क मानसीं हट्ट धरूनी
बसलों यावा अर्थ म्हणोनी

ग्रंथराज तो तरि समजावा
साक्षेपानें मज उमजावा
ऐशी किमया करशिल तूं जर
म्हणेन मजला तर मी साक्षर

२९-१२-६५

## कां कसें तें ?

मन रितें
मन रितें
कां नतें
उमजतें

दूर दारीं
खुडखुडतें
न थांबतें
पळंटतें

सप्तरंगी
टर्फलतें
बुडबुडा
जें भासतें

दडतें का
असतें का
दृष्टिपथा
बाहिरतें

कणकणी
झिजतें ना
कायमचें
तरुण तें

सांगत ना
कळत ना
कुढतें तें
कढतें तें

न डुंबतें
पाण्यांत तें
भडभडतें
डोळ्यांत तें

कोमल तें
निष्ठुर तें
कां बनतें
ना कळतें

पंचेंद्रिय
सांडून तें
कां बसतें
न सांगतें

क्षणक्षणीं
नवनवें
मरते तें
उपजतें

कां असे तें
ना समजें
ना दिसतें
कां असतें

कां असें तें
कां असें तें
भरलेलें
परि रितें

३०-१२-६५

## ओलेतीस

कमलांगीचे नितळसे अंग
कटीभवतीं मुरडलां तंग

रतीने लोभावे असे रूप
कनक कोंदणि मोती अभ्राप

स्नान देवता विरळ वस्त्राने
वेढलेली गाढ आलिंगने

उन्नत उरोज लपले लाजून
पहात भवतीं आडून आडून

ठिपकली जलबिंदु मातीवर
पेंडे तुटून मोतीं हाराभर

काय स्वप्न पहाती नयन
ओलेचिंब थबथबते यौवन

पाठीच्या पन्हळांतून मादकता
निथळते ओसंडून जातां जातां

३१-१२-६५

## एकुलत्या फुलास

या कठोर दगडांसंगें
कां डोलसी तूं रूपरंगें
वैराण अशा या रात्रीं
एकटाच अपुल्या गात्रीं

एकटाच तूं रे धिटा
शोधिशी जगीं सुखवाटा
कां डुलसी कां हससी
कोण सवंगडी तुजपाशीं

क्षणभंगुर या जीवनीं
असतोस कसा रंगुनी
हा विचार येतां मनीं
हिरमुसला मी त्या क्षणीं

१-१-६६

## ऐक वेश्या

सर्व ऋतु तुजला समान कसे
का तुज जीवनीं रस या नसे

कां फुकट जातसे काळ कंठुनी पिसें
काय तुज सुख या असल्या मिषें

पाहुनी तुजला कींव मनीं येतसे
उलगडे न कोडें मन वेडें होतसे

वदनावरती भाव कसा तो नसे
तडकली काच तसे ते दिसे

उदास असुनी रडतां हसतां रुसे
खिन्न परि म्लान वदन ना दिसे

भाव बदलती क्षणाक्षणाला असे
तरंग उठती पाण्यावरती तसे

ओठ संपुटीं पुटपुट चालू असे
अन् हातवारे हवेंत हलती तसे

दृष्टी शून्यावर अर्थांतरीं ती खिळे
करिसी कां मन्मानेल ते तूं चाळे

शुद्धबुद्ध ना वस्त्राची तुज कशी
योगीराज का वेडानें या खपशी

माना वळूनी मुठी वेळतां हेतु कायसा तुझा
कां बाल मनाने उगाच पहावी मजा

काय विचारीं वेडा मी का असे!
बिनवासाचे फूल फुले वेडें वेडे तसे

२-१-६६

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ४५२२५ वि. काव्य
स्थळ १५५० नोंद दि. २४।२।६८

## पेटला ज्वालामुखी

वसुंधरेचा ऊर थरथरे वसुंधरेचा ऊर
उत्पाताचे घाव पेलतां उधळे अलोट धूर

गंगेशाचे तांडव चाले तुलगति भेसूर
जणूं पातला समय साधित भ्याला भस्मासूर

लोळ उठती धूळीचे, धूमाचे, धगधगते
लाव्हा उसळे गगन पेटवीत लाल रंग त्याते

उकळत विव्हळत हृदय दुभंगे क्षुद्र मनुजाचें
का हृदय फाटलें, प्रेम हरपलें धरणीमातेंचें

कुशींत तुझ्या, विसावत निर्झर मृत्युंजय प्रसवे
कां जहर ओतसी कठोर काळिज कातळ काळा सर्वें

कां वन्हीं ज्वाला, कीं भडकला भुकेचा वणवा
तप्त नको गे, तृप्त हो तूं झालो मी ओणवा

उघडल्या ओष्ट संपुटीं फुंकर तूं घाल
नको भग्नहृदयीं पडल्या घावी हा वडवानल

१-१०-६६

## दे टाळी

मौनांत मुग्ध बोल तुझ्या
भासत केवळ शब्द रती
धीर धरींना मदन मुळीं
खुळा आळवी तव प्रीती

वाटा तुडवी काटेरी तव
दृष्टी खरी आंधळी
फुल गालिचा तोच वाटतो
तुडवतां ग पायतळीं

षड्ज पंचम सूर मिळवीत
वीणा नादतो ज्या वेळी
समेवती येतां तूं मी
दे ग, दे ग, दे टाळी

१५-१-६६

## साखर झोप

कर्दळीची भूल पडली
पहाट सुगंधाला
दवाखाली दडलेल्या
थंड अशा मातीला

संकोचला वारा फार
उघडीना पापणिला
उगवला भानू तोही
आला लपून आडोशाला

नको चालवूं शांत
शांत झोपलेला
उगाच चाहूल लागेल
गोड साखरझोपेला

१३-१०-६६

## वेदना

दु:ख सोकावतें : अंगी डोकावते
भूत संबंध ते : ओम फोफावतें
अगतिक होतां : वेदना गांठतें
येना विस्मरतां : शीघ्र उंचावते
धावत सैरावैरा : अंगी भरला पसारा
डोंब उठला अंतरी : ज्वाला पेटली उभारा
तीक्ष्ण टोंक तिचें : टोंचतें शरीरीं
क्रूर क्षण ठाके : टाके ढिले करी
अंगीं भिनलेली : वेदना ज्याची त्याला
परका म्हणेना : घेईन एक वेळां

१४–१०–६६

## माझ्या दारीची कर्दळ

माझ्या दारींची फुलली कर्दळ
लाल नारिंगी, पिवळी वर्दळ
माझ्या दारींची तेवढीच खूण
रिकामी चौसोपी वाटेना सुन्न

नाजूक कोमल जीवनी रंग भरे
रुंदावल्या पानीं शोभत ग तुरे
कर्दळीनें जीवनी जीवन ओतलें
नव्या बेहोषीने रंगून मी गेले

१५-१०-६६

# शुभांगी

गवती पाऱ्याचें सोनेरी छप्पर
खाली शोभे कर्दळी झालर

वेलबुट्टी पैठणी किनखापी पदर
हिरव्या वसनीं झुले वाऱ्यावर

सजणी उभी दारीं शुभांगी उजवी
खट्याळ फुंकर मन पिसारा उभवी

१६–१०–६६

## जवळीक

सुंदर प्रासादीं दगडी गडगा
ठेवीत जगाला दूर आड गा

कर्दळी वाफा आडवा सदाचा
तळीं शोभेचा रंगीत गालीचा

असोनी प्रसाद सुंदर सुंदर
गालीच्यावरी ठरते नजर

कर्दळ नाजूक ठुसकी ठेंगणी
तिनें जमविली मैत्री अंगणीं

असा प्रासाद दूर दूर एक
कर्दळीनें जोडली तेथें जवळीक

१६-१०-६६

## हेवादावा

रुसली कर्दळी रुसला वाफा
म्हणे उभा कां ? तरुणी ताफा

अतां अम्हांला अव्हेरणार का ?
या तरुणींच्या नादीं तुम्हि का ?

रंग अमुचा सजीव असतां
निर्जिव रंगीं कां आसुसतां ?

उथळ बेगडी ही भुलावणी
वाटत नाहीं का ती अळणी ?

सोडून द्या ही निमकहरामी
येतिल कां त्या रमणी कामीं ?

१६–१०–६६

## तळपते पातें

घाम निथळुनी सतेज करतो काळी कांती पहा
शिसवी स्नायु शिसवी तुळया कापित कापित हा

निळी जांभळी करवत तळपे लीळया लवलाही
सर्र्ऽऽ सर्र्ऽऽ फिरतां चिरते, झाड दगडी ही

हायदोस् हल्ला हुल्ला चढतां भूसा पडतो पार
अर्धचंद्राकृति करवत कर्पे घासुन घासुन फार

चिरकामी हात हुकमी, उठवित इमले दुसऱ्याचे
त्यास कोरडी भाकर तुकडा प्रेम चघळण्याचे

घाम घसरत मानेवरूनी ओलेत्या पाठीं
कधीं न त्याचे तेज मावळे, कपाळीं न आठीं

१८–१०–६६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ........ दि: ....................
...........................

## नव्यानें बहरली

मरगळली कर्दळी
निर्जिव झाली
लुळी पांगळी...पिकली, सुकली मुळीं

रडवेला मी अंतरी
कळवळलों
वळवळलों...एकदांच अपुल्या स्थळीं

कर्दळी मान टाकलेली
पाहवे ना
उमगे ना...नयनीं अश्रु मी गाळीं

बघतां बघतां तिला
कोंब उगवला
वंश बहरला...मातींत पायदळीं

कोवळ्या अंकुरीं फुटली
नव्हती तेथुन
निर्जिवतेतुन...खेळूं लागली खुळी

नवथर ललना
चितारलेली
उभारलेली...नव्यानें बहरली

१८-१०-६६

## ओल्या जखमा

पहुडलेल्या तुझ्या जखमा
विव्हळून झोंबताहेत
त्यांचा कांहीं निरोप
कळवळून सांगताहेत

ओघळले तुझे अश्रू
पूर वाहून धावताहेत
आठवणींचे ओले क्षण
तुला मला भिजवताहेत

उगाच फुलल्या पाकळ्या
कानांत कांहीं सांगताहेत
गाणें त्यांचें ऐकूं येतें
तेथेंच मनें रमताहेत

पण पाकळ्या गळून गेल्या
भुईवर झोपताहेत
अन् सडून माती झाल्या
तरीहि नातें जोडताहेत

३०-११-६६

# इतक्यांत कळी हसली

चाफ्याखालीं सावली डुलली
वनराणी वेडावली
उभा मी जवळी - इतक्यांत कळी हसली

सखी सन्निध खुळी
माझी सावली
वनवेली खाली - इतक्यांत कळी हसली

स्मित मुख मम सुभगा
बाला कोवळी
जवळ बैसली - इतक्यांत कळी हसली

कोयल गातां गीत
मधुर मंजुळ
जीवन-पथ उजली - इतक्यांत कळी हसली

सखी चांदणी राजसवाणी
सालंकृत सजली
जली पहुडली - इतक्यांत कळी हसली

## पण हे भान कोणाला ?

निखळलेल्या ताऱ्यासंगें
हेलावून मन दचकतें
श्रावणांतल्या सौदामिनीनें
आसमंत उजळतें

घनघोर काळोखांत
एक कर्कश आरोळी
कानोसा घेऊन ऐकतां
मनांत भीती ओळी

आवाज होता दरीतून
आलेला प्रतिध्वनि
गडगडाट असाच होतो
चमकल्यावर तेजस्विनी

पण हे भान कुणाला
झांटीपी पुढें साक्रेटीस
मन झाले मऊ सूत
वाऱ्यावर मोरपीस

२१-७-६७

## निळ्या ओढणी खाली

नवें अस्तर नवा रंग
पालटून गेली जुनी काया
कात टाकून नागीण यावी
तशी आली माझी प्रिया

अवतार पाहून चरकलों
असा कांहीं डंख घेणार
करपाश टाकून कंठांत
मला केलें ताबेदार

मी फार बुलंद तरी
मला लटकली चपखळ
खडक फोडून नितळ तळ
असें उमलावें कमलदळ

नवनीतापरी विरघळलो
तिच्या उष्ण श्वासांनीं
अन् निळ्या ओढणीखाली
दडलेल्या कृष्णकमळांनीं

१२–६–६७

## काळा फळा

लाल निळ्या रेषा काळ्या काळ्या फळ्यावर
रेषा कसल्या रेघोट्या त्या भवितव्याच्या भाळावर

काळ्या दगडावरची रेघ पुसली तरी जात नाही
काय असेल ठाउक कुणा उद्या व्हायचं कळत नाही

शाळेंत ओढलेल्या रेघोट्यांवर पुढचीं पाऊलें वळतात
तीच पुढच्या पिढीला नवा आधार देतात

या रेघोट्यांच्या विश्वांत गुंतलेलें असते एक कोडें
तेच सुटतां सुटत नाही, आयुष्य भासतें थोडें थोडें

२९-५-६७

## नाही मिती

काळा डांबरी लांब पट्टा
त्याला फुटतात चार वाटा
चार वाटा चोहिंकडे
दौडलेल्या इकडे तिकडे

या वाटांतून त्या वाटांवर
चार दिशांच्या दौऱ्यावर
धडधडणारा त्याचा उर
मरगळलेला त्याचा सूर

स्वस्थ आडवा पडून रहातो
व्यथा समक्ष जाळीत बसतो
अपंगाचें प्रेम झेलतांना
चाकें गोल गरगरतांना

सुसाट वारा पिउन पळतो
एकसारखा धावत असतो
प्रदक्षिणा त्याची मोठी किती – मोठी किती
त्याला काहीं नाहीं मिती – नाही मिती

४-९-६७

# वेताळ वृत्ती

हपापलेल्या नजरा
वखवखलेली वेताळ वृत्ती
न्यहाळत,
बिजलीच्या झगमगाटात
रेंगाळलात
काळे अंतरंग
ढंगाखाली झाकून
नजराना फसवतात
चिकाच्या पडद्याआड
झाकलेली
मानवी विटंबना
झरोक्यांतून पाहतांना
भुलवणारी मादक ललना,
भिंतीच्या मागें
मारवलेली मनें
आगळ्या यातना,
ओसंडत,
चारित्र्याच्या चिखलाखाली
चुरून चुरगळून
फेकलेल्या कुसुमकळ्या
निसरड्या पायवाटांवर,
पैशांचा पूर,

पण ना विटकी चिंधी
झांकून घेण्या उर
वस्त्रांच्या प्रावरणाखालीं
अगदी नंगा नाच
अ रे रे असाच
घालणार ना ?

४-६-६८

## दोरीवरचे रंगीत कपडे

दोरीवरचे रंगीत कपडे
वाऱ्यावरती भिरभिरती
नीट नेटके लावूनी त्यांना
परटीण परते मागे ती

छीचोर सज्जन चंगी भंगी
असती एका दोरीवरती
कुणीही पहावें त्यांना दुरुनी
सारे दिसती एकप्रती

मनें माणसें जगीं असती
तसेंच कपडे त्यांचे दिसती
परटाला परि दुजा भाव ना
त्याची सारी एक संगती

उपरणे अन् परकर यांना
एका मापानेच गणी
वारकरी अन् वारयोषिता
दोन्हीही त्याचे असती धनी

परिट जैसा कपडे लेखी
तसेंच जगती उच्च नीच ना
सम्यक् वृत्तीनेंच जगावें
हिच नसे का त्याची भावना ?

२२-६-६८

## का ! कधीं

मिळेल का मज कधीं ! क्षण एक सुखाचा
क्षण प्रेमाचा, मज मातेचा, रंध्रातूनीं उठल्या लहरींचा

कळेल का मज कधी ! जावळातूनी मृदुलतेचा
वात्सल्याचा हात कसा तो फिरवायाचा

बसेन का मी कधी ! पायरीवरी सुखद दंगुनी
इवल्याशा दुडदुडणाऱ्या पाउलांत रंगुनी

कळतील का मज कधी ! वेणा ज्या फुलवती
वातीच्या ज्योती उजळती अंधार मज भवती

म्हणेल का मज कधी ! कुणी "आई" म्हणूनी
जुळेल का ती कधीं तडकली कांच तापूनी !

चाखिल का हे कधी ! कुणी जीवन माझे स्तनी
भिजवूनी कांचोळी इवलाल्या मृदु ओठांमधूनी

रुळेल का कधी ! खांद्यावरती हात कुणाचा
गोजिरा मम भाग्याचा फुलवित मनीचा बाग फुलांचा

हेवा ना कधी मला कुणाचा पण यावा क्षण भाग्याचा
'आई' म्हणूनी या कानांचा जीव करोनी ऐकवण्याचा

मराठी ग्रंथ ... अनुक्रम ... दि: २०-७-६८

REFBK-0016958
REFBK-0016958